CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

दि. 19.01.2022

## नवी मुंबईतील रेल्वे स्थानकांतील सोयीसुविधांच्या योग्य देखभालीसाठी डॉ. संजय मुखर्जींतर्फे विशेष समितीची स्थापना

नवी मुंबईतील सिडकोच्या रेल्वे स्थानकांवर प्रवाशांशी निगडीत सोयीसुविधांबाबत विविध विषयांचा आढावा घेऊन, त्यावर योग्य देखभालीसाठी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्यातर्फे एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली आहे. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकांसह या समितीमध्ये अन्य 5 अधिकारी हे सदस्य आहेत.

"नवी मुंबईला सदैव गतिमान ठेवण्यामध्ये येथील उपनगरीय रेल्वेची भूमिका महतत्वाची आहे. नवी मुंबईतील उपनगरीय रेल्वे नेहमीच कार्यक्षम राहावी यावर सिडकोने नेहमीच भर दिला आहे. स्थानकांसंदर्भात प्रवाशांना सोयीसुविधा अधिक योग्य पद्धतीने प्रदान करण्याकरिता विशेष समिती स्थापन करण्यात आली असून यामुळे प्रवास अधिक सुखकर होईल."

डॉ. संजय मुखर्जी
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

नवी मुंबई मुंबईला जोडली जावी याकरिता सिडकोने रेल्वेच्या सहाय्याने नवी मुंबईमध्ये उपनगरी रेल्वे मार्गांचे जाळे निर्माण केले. सिडकोने नवी मुंबईमध्ये विकसित केलेली रेल्वे स्थानके अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दोन्ही बाजूंस चढ-उतार करता येतील असे प्रशस्त फलाट, भव्य फोरकोर्ट एरिया, स्थानकांवर वाणिज्यिक संकुलांची उभारणी यांमुळे नवी मुंबईतील रेल्वे स्थानके ही अन्य उपनगरीय स्थानकांच्या तुलनेत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. सिडकोतर्फे सिवूड्स दारावे स्थानक वगळता नवी मुंबईतील उर्वरित स्थानकांची देखभाल केली जाते.

तथापि, प्रवाशांना या रेल्वे स्थानकांवर कोणत्याही समस्यांना सामोरे जावे लागू नये यै पार्श्वभूमीवर डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालकांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये सहव्यवस्थापकीय संचालकांव्यतिरिक्त सिडकोतील मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ) (सदस्य), अधीक्षक अभियंता (पालघर व

नगर नियोजन-1) (सदस्य सचिव), पणन व्यवस्थापक (वाणिज्यिक) (सदस्य), नवी मुंबई महानगरपालिका प्रतिनिधी (सदस्य) आणि भारतीय रेल्वेचे प्रतिनिधी (सदस्य) यांचा समावेश आहे.

पुढील 15 दिवसांत या समितीतर्फे नवी मुंबईतील स्थानकांना भेट देण्यात येऊन सिडकोच्या व रेल्वेच्या कामांची व्याप्ती, नवी मुंबई महानगरपालिकेची भूमिका, स्थानकांवरील समस्यां संदर्भातील त्रुटी, या त्रुटी दूर करण्याकरिता शिफारसी या बाबींचा आढावा सदर समितीकडून घेतला जाणार आहे. त्यानंतर या संदर्भातील अहवाल समितीकडून उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सादर केला जाणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**